# नियम पुस्तिका - चौदा

**स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके -**

विविध कामे पार पाडण्यासाठी विविध प्रमाण पद्धती नेमून देण्यात आल्या आहेत.

- निवासी इमारती, वाणिज्य इमारती, रुग्णालये, शाळा इत्यादि नुसार त्या विभागात निर्माण होणारा मैला (पर माणसी पाणी पुरवठा) आणि तेथील लोकसंख्येच्या अनुसार डी.सी. अधिनियमान्वये आणि वेळोवेळी निर्देर्शित होणा-या शासकीय धोरणानुसार विविध कामांसाठी मलनि:सारण यंत्रणेचे संकल्पन करण्यात येते.
- जलनि:सारण उपविधीमध्ये विर्निदिष्ट केल्यानुसार.
- शोषण टाक्या- शौच कुपे/ उर्ध्ववाही गाळणी मलनि:सारण प्रक्रीया सयंत्र इत्यादिंचे संकल्पन आय.एस: 2470 भाग(दोन) (1985) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या प्रमाणकानुसार करण्यात येते.
- विकास मर्यादा अधिनियमामध्ये विर्निदिष्ट केलेल्या प्रमाणकानुसार झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण योजना आणि पुर्नविकास योजना ठरविण्यात येतात.
- महिन्यातून एकदा विविध कामाच्या स्थळांना भेटी देणे आणि माल आणि कामाच्या गुणवत्तेची यादृश्चिक तपासणी करुन कामावर संनियंत्रण ठेवणे.
- मलनि:सारण प्रकल्प खात्याच्या विविध कामाच्या स्थळांचे निरिक्षण करणे आणि गुणवत्ता प्रमाण आणि कामाच्या सर्वसाधारण प्रगतीची तपासणी करणे.